# मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ

भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव वडाळा क्रॉस रोड, मुंबई-४०० ०३१.

## सन २०२२-२०२३ या वर्षातील कार्याचा अहवाल

## [वर्ष ८८ वे]

**[प्रास्ताविक:- "बलम् राष्टस्य वर्धनम्" या उदात्त राष्ट्रीय ध्येयाने प्रेरित होऊन दि.२९ जून,१९३५ साली म्हणजे ब्रिटीश राजवटीत मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाची स्थापना झाली. संस्थेने आजवर अनेकविध उपक्रम राबवून शारीरिक शिक्षण व क्रीडाक्षेत्रासाठी वैशिष्टयपूर्ण असे योगदान दिलेले आहे. मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाने सन १९७८ साली शारीरिक शिक्षण महाविद्यालयाची स्थापना केली आणि संपूर्ण देशात आपल्या कार्याचा ठसा उमठवला आहे. याचबरोबर संस्थेने क्रीडाप्रशिक्षण केंद्र, योग अभ्यास केंद्र, जिम्नॅस्टिक्स केंद्र, रिदमिक जिम्नॅस्टिक केंद्र, फिटनेस सेंटर तसेच मुंबई शारीरिक शिक्षण पुरस्कृत जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा, आंतरशालेय हिंद करंडक स्पर्धा, आंतरशालेय दत्ताराम लाड लेझिम स्पर्धा अशा अनेकविध उपक्रम मंडळाच्या वैशिष्टयपूर्ण कार्याची साक्ष पटवून देत आहेत.**

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचा सन २०२२-२०२३ या वर्षातील कार्याचा अहवाल मंडळाच्या सभासदांना सादर करतांना नमुद करू इच्छितो की, कोव्हीड-१९ या जगभरात पसरलेल्या महामारीच्या प्रादूर्भावामुळे या अहवाल वर्षात संस्थेच्या / महाविद्यालयाच्या कार्यात अनेक अडथळे व अडचणी आल्या. अशा या प्रतिकुल परिस्थितीत संस्थेच्या अध्यक्षाच्या मार्गदर्शनाखाली संस्थेतील व महाविद्यालयातील सर्व कर्मचा-यांनी करोनाचा संयमाने, धीराने, मुकाबला करत अनेक कार्यक्रम राबविले त्या कार्याचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे-

### १. संस्थेच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे कार्य

सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात कोरोना महामारीमुळे संपूर्ण वर्षभर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वर्गात, मैदानावर, शाळांमध्ये नेऊन सराव अध्यापन किंवा विविध उपक्रमांचे आयोजन, सहभाग या शिक्षक प्रशिक्षणासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या गोष्टी हया ऑनलाईन पध्दतीने शिकविण्यात आल्या. असे असले तरी अत्यंत प्रतिकुल अशा या परिस्थितीत शासन व विद्यापीठ यांचेकडून प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.घनश्याम ढोकरट यांच्या सक्षम नेतृत्वाखाली शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांनी अनेकविध शैक्षणिक बाबी सक्षमपणे पार पाडल्या. त्याचा संक्षिप्त गोषवारा पुढीलप्रमाणे-

### १.१ महाराष्ट्र ॲमेच्युअर जिम्नॅस्टिक असोसिएशन्सची निवडणुक

महाराष्ट्र ॲमेच्युअर जिम्नॅस्टिक असोसिएशन्सची निवडणुकीत मुंबई शारीरिक शिक्षणाचे मंडळाचे सन्मा.अध्यक्ष श्री.संजय बाबूराव शेटे यांची अध्यक्षपदावर निवड झाल्याबद्धल त्यांचे पुष्पगुच्छ देवून हार्दिक अभिनंदन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. ढोकरट, रिदम हॉस्पिटल सर्व्हिसचे श्री.दिपक पाचसूपे, डॉ.मकरंद जोशी व रिदम हॉस्पिटलचे कर्मचारी उपस्थित होते.

### १.२ आंतरराष्ट्रीय योग दिन

दि.२१ जून, २०२२ रोजी 'आंतरराष्ट्रीय योग' दिनानिमित्त महाविद्यालयाद्वारे सातारा सहकारी बॅंक व महाराष्ट्र अर्बन कॉ.ऑप. बॅंक कर्मचारीकरीता योगासन शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात सातारा सहकारी बॅंकेचे सीईओ श्री.पाटील साहेब व महाराष्ट्र अर्बन कॉ.ऑप. बॅंकेचे कर्मचारी तेसच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते.

## १.३ आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक डे

दि.२३ जून २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिनानिमित्त आयोजित केलेल्या शिवाजी पार्क ते महाविद्यालय रॅलीमध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थीनींनी रॅलीमध्ये लेझीमचे प्रात्यक्षिक सादर केले.

## १.४ पायी पर्यटन/गिर्यारोहण /सहल

अभ्यासेतर कार्यक्रमा अंतर्गत आयोजन व प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून दि.१५ जूलै २०२२ रोजी महाविद्यालयाचे बीपीएड सत्र-१ च्या विद्यार्थ्यांना नेरळ ते माथेरान या निसर्गरम्य ठिकाणी पायीपर्यटन व गिर्यारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी बीपीएड अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी निसर्गाचा आनंद मनसोक्त लुटून नेरळ ते माथेरान व परत हे अंतर पायी चालून आपल्या शारीरिक सक्षमतेची चुणुक पटवून दिली. तसेच द्वितीय सत्रातील प्रशिक्षणार्थिंची एलिफंटा येथे सहलीचे आयोजन करण्यात आले.

## १.५ सामाईक प्रवेश परीक्षा चाचणी आयोजन –

बीपीएड व एमपीएड अभ्यासक्रमाची सन २०२२-२०२३ या बॅचची शासनाद्वारे घेतली जाणारी प्रात्यक्षिक प्रवेश परीक्षा [सीईटी] ही अनुक्रमे दि.३ ते ४ ऑगष्ट २०२२ व दि. २२ ऑगष्ट,२०२२ या कालावधीत सुरक्षेचे सर्व नियम पाळून यशस्वीरित्या पार पडली.

## १.६ प्रजासत्ताकदिन कार्यक्रम –

दि.१५ ऑगष्ट २०२२ रोजी ध्वजवंदन करून प्रजासत्ताकदिन साजरा करण्यात आला. त्यावेळी संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा.श्री.दिपक बाबूराव शेटे यांच्या शुभहस्ते राष्ट्रध्वज फडकवून प्राचार्य प्रा.डॉ.घ.का.ढोकरट व मा.श्री.दिपक शेटे यांनी आभासी माध्यमातून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास संस्थेच्या विश्वस्थ मंडळाचे सदस्य श्री.संग्रामसिंह शेटे व महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## १.७ क्रीडाज्ञान परिक्षेत(online)

दि.२१ ऑगष्ट २०२२ रोजी क्रीडा भारतीद्वारा आयोजित क्रीडाज्ञान परिक्षेत (online) विद्यार्थ्यांचा सहभाग

## १.८ प्राचार्य पदाच्या नियुक्तीकरीता मुलाखतीचे आयोजन

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य पदावर नियुक्तीकरीता दि.२१.८.२०२२ रोजी महाविद्यालयात प्राचार्यांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. सदर मुलाखतीकरीता शासनाचे प्रतिनिधी म्हणून उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक श्री.मानेसाहेब तसेच विद्यापीठ प्रतिनिधी व विषयतज्ञ असे एकूण १२ तज्ञ मुलाखत घेण्यासाठी उपस्थित होते. सदर मुलाखतीकरीता एकूण ३ सदस्य उपस्थित होते. सदर प्रसंगी संस्थेचे सन्मा.अध्यक्ष श्री.संजय शेटे यांनी सर्वांचे पुष्पगुच्छ देवून आभार व्यक्त केले.

## १.९ प्राचार्यांची नियुक्ती

दि.२१.८.२०२२ रोजी झालेल्या प्राचार्यांच्या मुलाखतीत महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. घन:श्याम काशिनाथ ढोकरट यांची मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी दि.२२.८.२०२२ पासून पुढील ५ वर्षाकरीता नियुक्ती करण्यात आली. सदर प्रसंगी संस्थेचे सन्मा.अध्यक्ष श्री.संजय शेटे साहेब व संस्थेचे सचिव श्री.दिपक शेटे साहेब यांनी नवनियुक्त प्राचार्य यांचे पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## १.१० ॲथलेटिक्स प्रशिक्षण व मैदानी स्पर्धा

बीपीएड अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांना दि.२९.०८.२०२२ व ०३.०९.२०२२ या कालावधीत विद्यापीठ क्रीडा संकुल, मरीन लाईन्स येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटीक धावन मार्गावर ॲथलेटीक्सचे प्रशिक्षण देण्यात आले तसेच बीपीएड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. त्यावेळी उद्घाटन प्रसंगी संस्थेचे सन्मा.अध्यक्ष मा.संजय शेटे, प्रा.डॉ.दळवी तर समारोप प्रसंगी विशेष अतिथी डॉ.घनश्याम केदारे (MHACET Incharge, Govt. Of Maharashtra) यांना आमंत्रित करण्यात आले होते. सदर स्पर्धेत गुणाधिक्याने कुलास विभागून विजेतेपद मिळाले.

## १.११ शिक्षक दिन

दि.५ सप्टेंबर,२०२२ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्राध्यापक डॉ.घ.का. ढोकरट यांनी शिक्षक दिनाचे महत्व प्रभावी व परिणामकारकरित्या कथन केले. डॉ. मन्मथ घरोटे [संचालक, लोणावळा योग संस्था] यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी बीपीएड/एमपीएड अभ्यासक्रमाचे सर्व विद्यार्थी व महाविद्यालयाचे शिक्षक उपस्थित होते.

## १.१२ नेट/सेट परीक्षा पूर्वतयारी कार्यशाळेचे आयोजन

दि.६ ते १० सप्टेंबर, २०२२ रोजी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी नेट/सेट/जेआरएफ पात्रता चाचणीची पूर्वतयारी कशी करायची या विषयावर डॉ.अनिल करवंदे व श्रीमती संगिता खरे यांनी व्याख्यान दिले. यात महाविद्यालयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रम, संशोधन केंद्राच्या विद्यार्थ्यांनी तसेच सर्व शिक्षकांनी भाग घेतला. सदर वेबिनारमध्ये शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यावेळी सदर परीक्षेचे सुप्रसिध्द तज्ञ डॉ.अनिल करवंदे व श्रीमती संगिता खरे यांनी सर्वांना मौलिक मार्गदर्शन केले.

## १.१३ स्काऊट आणि गाईडचे मार्गदर्शन

दि.१० ते १६ सप्टेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील बीपीएडच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड यांच्यामार्फत बेसिक ट्रेनिंग कॅम्पचे आयोजन सानेगुरूजी राष्ट्रीय स्मारक, वडघर, ता.माणगांव या ठिकाणी आयोजित करण्यात आले. सदर प्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक व भारत स्काऊट गाईड केंद्राचे प्रशिक्षक उपस्थित होते. स्काऊट आणि गाईड कॅम्पच्या समारोप प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. संजय शेटे साहेब, सचिव री.दिपक शेटे साहेब, कार्यकारीणी सदस्य श्री.गुरव साहेब व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.घ.का. ढोकरट उपस्थित होत.

## १.१४ स्वच्छता अभियान

दि.१० सप्टेंबर २०२२ रोजी स्वच्छता अभियानात गणपती विसर्जनानंतर गिरगांव चौपाटी येथे बीपीएड प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग.

## १.१५ स्ट्रेंथ व कंडीशनींग कार्यशाळेचे आयोजन

म्हाविद्यालय व गायो फिटनेस यांच्या संयुक्त विद्यमाने वर्ल्ड फिटनेस गुरू श्री.इयान जेफ्री यांच्या मार्गदर्शनाखाली दि.७ ते ९ ऑक्टोंबर २०२२ असे ३ दिवसाचे स्ट्रेंथ व कंडीशनींग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेस महाविद्यालयातील बीपीएड, एमपीएड अभ्यासक्रमातील विद्यार्थी व क्रीडा क्षेत्रातील प्रशिक्षक, खेळाडू यांनी सहभाग घेतला.

**१.१६ आश्वासित प्रगती योजनेचे आयोजन**

दि.१६ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील शिक्षकांसाठी आश्वासित प्रगती योजनेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील शिक्षकांची आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पदोन्नती करण्याकरीता CAS समितीचे आयोजन करण्यात आले. सदर योजनेत महाविद्यालयातील शिक्षकांचे स्टेज १ ते २, स्टेज २ ते ३ व स्टेज ३ ते ४ या श्रेणीकरीता पदोन्नती करण्याकरीता शासनाचे प्रतिनिधी श्री.डॉ.रोजेंद्र धामणसकर विद्यापीठ प्रतिनिधी, श्रीमती प्रतिक्षा फडणीस, श्री.सतिश शिंदे, डॉ.मकरंद जोशी, डॉ.शरद अहेर, संस्थेचे अध्यक्ष श्री.संजय शेटे व सचिव श्री.दिपक शेटे उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सर्व उपस्थित तज्ञ मंडळीचे आभार व्यक्त केले.

**१.१७ अंतरकुल कबड्डी सामन्यांचे आयोजन**

महाविद्यालयातील बीपीएड विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांना आयोजन नियोजन, सहभाग या सर्व बाबी ज्ञान प्राप्त होण्याकरीता दि. २५ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अंतरकुल कबड्डी सामन्यांचे आयोजन करण्यात आले. सदर अंतरकुल स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी कु.नेहा सापते अंतरराष्ट्रीय नेमबाज व संस्थेचे सचिव सन्मा.श्री.दिपक शेटे उपस्थित होते.

**१.१८ शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ** (सन२०२२-२०२३)

कोरोना महामारीमुळे अहवालसाली प्रवेश प्रक्रिया उशिरा झाल्याने बीपीएड अभ्यासक्रमाच्या ४४ व्या व एमपीएड अभ्यासक्रमाच्या २५ व्या शैक्षणिक वर्षाची सुरूवात ही नविन वर्षाच्या सुरूवातीस म्हणजे ४ जानेवारी २०२३ रोजी झाली. त्यावेळी प्राचार्य प्रा.डॉ. घनश्याम का.ढोकरट यांनी सर्वांना सद्याच्या प्रतिकुल परिस्थितीवर मात करून अभ्यासक्रम कसा पूर्ण करायचा याचे मार्गदर्शन सर्व विद्यार्थी व शिक्षकांना केले. उदघाटन कार्यक्रमाचे संयोजन डॉ.नितू जोशी (सहाय्यक प्राध्यापिका) यांनी उत्कृष्ठरित्या केले.

**१.१९ महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक स्पर्धेची कीडा रॅली**

महाराष्ट्र शासन क्रीउा विभाग, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटना व मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र ऑलिम्पिक स्पर्धा २०२२ ची क्रीडा ज्योत रॅली समारंभाचे ३० डिसेंबर २०२२ रोजी आयोजीत करण्यात आली.

**१.२० आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन**

महाविद्यालयाच्या इतिहासात प्रथमच आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. International Conference on Physical Education, Sports Science & Holistic Approach of Yoga या विषयावर दि.१५ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. सदर संमेलनात अरर्जेटिना येथील श्रीम. नटालिया, श्रीलंका येथून श्रीम.अनोमा रत्नायके व देशातील शारीरिक शिक्षण क्षेत्रातील अनेक तज्ञ मंडळी उपस्थित होत्या.

**१.२१ आंतर-शालेय हिंद करंडक स्पर्धा[कबड्डी, खो-खो, लंगडी]**

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीदिखील संस्थेच्यावतीने दि. १४ ते १६ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत घेतल्या गेलेल्या कबड्डी, खो-खो व लंगडी या खेळांच्या सदर स्पर्धेत विविध शाळांच्या १३३२ मुला-मुलींनी भाग घेतला. महाविद्यालयाने घेतलेल्या आंतरशालेय हिंद करंडक स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मुंबई शहर जिल्हा क्रिडा अधिकारी आंतरराष्ट्रिय खेळाडू श्री. अभय चव्हान, उच्च व तंत्र शिक्षण उपसंचालक विभाग मुंबई चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.दाते साहेब व संस्थेचे सन्मा.अध्यक्ष श्री.संजय बाबूराव शेटे साहेब, सचिव सन्मा. श्री.दिपक बाबूराव शेटे आदी मान्यवर उपस्थित होते. सदर स्पर्धा महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.घ.का.ढोकरट यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या आयोजित केल्या.

### १.२२ शिवजयंती उत्सवाचे आयोजन

अहवालसाली रविवार दि.१९ फेब्रुवारी २०२३ रोजी गेटवे ऑफ इंडिया येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बीपीएडच्या ५० विद्यार्थी-विद्यार्थीनीद्वारे श्री छत्रपती शिवाजी महाराज शिवाजी महाराजांच्या पुतळयास झांज पथकाचे प्रात्यक्षिकद्वारे मानवंदना देण्यात आली. झांज प्रात्यक्षिकाचे नियोजन व प्रदर्शन डॉ.ज.म. होटकर यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडले.

### १.२३ मराठी भाषा गौरव दिन -

अहवालसाली दि.२८ फेब्रुवारी २०२३ रोजी ज्येष्ठ लेखक व कवी श्री.वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन' चे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात बीपीएड अभ्यासक्रमाती विद्यार्थी /विद्यार्थीनीनी अनेक विध कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घ.का. ढोकरट यांनी मराठी भाषेचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले.

### १.२४ होळी उत्सवाचे आयोजन

दिनांक ०६ मार्च २०२३ रोजी संस्थेच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे होळी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष सन्मा.श्री.संजय शेटे यांनी होळीचे पुजन करून होळी पेटविली. त्यावेळी संस्थेचे पदाधिकारी श्री.दिपक शेटे, श्रीमती अनुराधा शेटे, संग्रामसिंह शेटे, क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे पालक-विद्यार्थी, स्थानिक नागरिक, प्राचार्य प्रा.डॉ.घ.का.ढोकरट, डॉ.किशोर मारू इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

### १.२५ आंतरराष्ट्रीय महिला दिन

अहवालसाली दि.८ मार्च २०२३ रोजी महाविद्यालयात महिला दिनानिमित्त बीपीएड अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना अनेकविध कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.घ.का. ढोकरट यांनी महिलांचे सामाजिक स्थान यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

### १.२६ रक्त तपासणी व डोळे तपासणी शिबीर-

महाविद्यालयाने दि.१९ मार्च, २०२३ रोजी बालमोहन शाळेच्या माजी विद्यार्थी संघटनेच्या सहकार्याने रक्त व डोळे तपासणी शिबिराचे आयोजन केले त्यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रक्त व डोळे तपासणी करून घेतली. सदर कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी एस. आर.एल.(एजीलस डायग्नोस्टिक) पॅथोलॉजी लॅबचे संस्थापक डॉ.फडके, बालमोहन माझी चिद्यार्थी संघटनेचे श्री.आनंद लिमये, संस्थेचे सन्मा.अध्यक्ष श्री.संजय बा. शेटे सदर कार्यक्रमाची सुरवात आंतरराष्ट्रीय ऑरगन डोनर डे निमित्त बालमोहन तळेगाव येथून ते शारीरिक शिक्षण महाविद्यालय, वडाळा पर्यंत रन फॉर कॉज चे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रसंगी तळेगांव ते वडाळा पर्यंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रन फॉर कॉज मध्ये सहभाग घेतला तसेच काही विद्यार्थ्यांनी श्री.आनंद लिमये यांच्या मार्गदर्शनाखाली पाईलेटची भूमीका बजावली.

### १.२७ 'नॅक' मुल्यांकन [NAAC] -

नॅशनल असेसमेंट आणि अक्रेडिटेशन कौन्सिल (NAAC) या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिकृत स्वायत्त संस्थेद्वारे दर पाच वर्षांनी केल्या जाणा-या गुणवत्ता मुल्यांकनासाठी अहवाल साली दि.२३ ते २५ मार्च या कालावधीत पुढील तीन तज्ञांनी भेट देवून महाविद्यालयाचे गुणात्मक परीक्षण केले-

१. डॉ.परगत सिंग, प्रोफेसर, चंडीगड वुमन्स एज्यु. कॉलेज
२. डॉ.शिला स्टिफन, वाय.एम.सी.ए. शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या, चेन्नई
३. प्रो.के.लक्ष्मीकात सरकार, माजी कुलसचिव, एलएनआयपी, ग्वालिअर

मुल्यांकनानुसार महाविद्यालयास 'नॅक' द्वारे सन मार्च २०२३ ते मार्च २०२८ या कालावधीकरीता 'ब' श्रेणी (CGPA 2.26) प्राप्त झाली आहे.

## १.२८ महाराष्ट्र ऑलम्पिक संघटनेचे अध्यक्ष मा.ना.श्री.अजित पवार यांच्या हस्ते प्राचार्यांचा सत्कार

महाराष्ट्र ऑलम्पिक संघटना व मुबई शारीरिक शिक्षण मंडळाचे शारीरिक शिक्षण महाविद्यालय यांच्या सयुक्त विद्यमाने डोंबिवली येथे आयोजीत एक दिवसीय विचारमंथन परिसंवादाचे यशस्विरीत्या आयोजन केल्यबद्धल महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री व ऑलम्पिक संघटनेचे अध्यक्ष मा.ना.श्री.अजित पवार यांच्या शुभ हस्ते विधान भवन येथे झालेल्या आढावा बैठक प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.घ.का.ढोकरट यांना पूष्पगूच्छ देऊन केलेल्या कार्याच्या कौतुक करतानाचे क्षणचित्र.

## १.२९ ऑनलाईन अभ्यासक्रमातून संस्थेसाठी फंड निर्मिती

अहवालसाली महाविद्यालयाने 'गायो फिटनेस ॲकॅडेमी' यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई, विद्यापीठ मान्यताप्राप्त फिटनेस ट्रेनर व फिटनेस सेंटर मॅनेटमेंट प्रमाणपत्र अभ्यासक्रम देशात विविध ९ राज्यात ११ ठिकाणी म्हणजे मुंबई, दिल्ली, आसाम,(गोहाती), कलकत्ता, (त्रिशुल, कोची, कॅलीकट), मिझोराम (अपझॉल), बंगलोर, बेळगांव, गोवा, छत्तीसगड (रायपूर) येथे राबविण्यात आले त्यातुन संस्थेस अहवालसाली रू.४,३८,०००/- [चार लाख अडतीस हजार फक्त] इतका निधी उपलब्ध झाला.

# २. विद्यापीठ परीक्षा निकाल

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात झालेल्या मुंबई विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयाच्या बी.पी.एड. या दोन वर्षीय अभ्यासक्रमाचा [२०२१-२२] निकाल १००% लागला. तसेच एम.पी.एड. [२०२१-२०२२] [द्वितीय वर्ष] अभ्यासक्रमासाठी बसलेल्या २५ विद्यार्थ्यांपैकी २५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन १००% निकाल लागला.

तात्पर्य, दिवसेंदिवस मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचा गुणात्मक दर्जा उंचावत आहे. आजवर मंडळाच्या या महाविद्यालयातून तयार झालेले सुमारे ५,००० शिक्षक देशाच्या कानाकोप-यात अनेकविध शाळा-महाविद्यालयातून यशस्वीरित्या कार्य करीत आहे. आज १०० टक्के विद्यार्थ्यांना अग्रक्रमाने व प्राधान्याने नोक-या मिळत आहेत यावरून महाविद्यालयाची गुणवत्ता सिध्द होते. ही बाब संस्थेच्या दृष्टीने अत्यंत भुषणावह व अभिमानास्पद आहे.

३. शिक्षक सहभाग व विशेष कार्य–

अ. शिक्षक सहभाग व विशेष कार्य

वर्षभरात महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षकवृंदाने खालील विविध चर्चासत्रे, कार्यशाळा व परिषदांमध्ये भाग घेऊन शोधनिबंध सादर केले--

| Sr. No. | Name of the Teacher | Theme of the Seminar/Conference/Symposia please specify whether it was a Seminar/ Conference/Symposis as the case may be) | Name of the Organiser | Date & Place | Title of the Paper presented/read |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Dr. R. C. Kawade** | Webinar on yoga Upanishad | Lonavla yoga institute | 3.1.22 to 11.3.22 | Participated |
| | | Webinar on Hidden aspect of hatha Pradipika (10 Chapters) | Lonavla yoga institute | 11.4.22 to 17.6.22 | Participated |
| 2 | **Dr.N.O. Joshi** | Sports Psychology, 30th National Conference on Sports Psychology | Sports Psy. Ass. of India & Dr. Ambedkar College, Nagpur | 27th & 28th March,23 | Resource person |
| | | International Workshop on Athletics & Soft Hockey | School of Educational Sciences & Depart. of Phy. Edu., Swami Ramanand Teerth Marathwada Uni., Nanded | 28th & 29th March,23 | Resource person, Training, Coaching & Officiating in Athletics, |
| 3 | **Mrs.M.A Samant** | 12 - Days Workshop on "Research Methodology" (IAQC) | N.K.College of Arts, Comm., Management & Science., Malad, Mumbai. | 27.6.22 to 9.7.22 | Participated |
| | | 2nd Online Short Term Course on E-content Development & MOOCs | UGC-HRD Centre Gujarat University Ahmedabad | 23.8.22 to 29.8.22 | Participated |
| | | 10th Online Short-Term Course on ICT | UGC-HRD Centre Gujarat University Ahmedabad | 7.11.22 to 13.11.22 | Participated |
| | | Online Ph.D. Coursework with Research and Publication Ethics (RPE) | UGC-HRD Centre Gujarat University Ahmedabad | 29.12.22 | Participated |
| 3 | Dr.R.N. Shelke | U.G.C REFRESHER COURSE | LNUPE, GWALIOR | 5.7.22 to 18.7.22 | Participated |
| | | International conference On physical education Sorts science and holistic approach of yoga | BPCA college of PhysicalEducation, Wadala | 15.1.23 | Comparison Of flexibility of students dwelling in slum area and non slum areas in greater Mumbai |
| | | International Conference On physical education Sorts science and holistic approach of yoga | BPCA College of Physical Education, Wadala | 15.1.23 | A comparative study ofmental health of athletics andnon athletics of Mumbai suburbans |

**ब.शिक्षकांद्वारे प्रकाशन कार्य :**

अहवालसाली महाविद्यालयाच्या शिक्षकांनी खालील महत्वपूर्ण लेखन/प्रकाशन कार्य केले.

| | |
|---|---|
| **1** | **Dr.R.C. Kawade**, 'Obesity and Modern Life Style, ISSN No. 2277-7067 Volume IX, Issue 1(VIII), January- June 2022, Page Nos.22 |
| **2** | **Dr.N.O. Joshi,** Effectiveness of Aerobic Training Programme on the basis of Optimum Health of housewife of Vasai Taluka International Conference on Physical Education, Sports Science & Holistic Approach of Yoga Paper Presentation/ Conference Proceeding ISSN. No: 2319-4766 Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies Jan-Feb, 2023 Vol.11/60 |
| | An Investigation on Muscular Endurance of Urban, Rural & Tribal Area Students of Thane District aged 12 to 14 Years (Pg.No.45-50) International Conference on Physical Education, Sports Science & Holistic Approach of Yoga Paper Presentation/ Conference Proceeding ISSN.No:2319-4766 Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies Jan-Feb, 2023 Vol.11/60 BPCA's College of Physical Education, Wadala, Mumbai-31 |
| | A Study of Effect of Integrated Exercises Training Module on Agility of Volleyball Players of Mumbai (Pg.No.75-79) International Conference on Physical Education, Sports Science & Holistic Approach of Yoga, Paper Presentation / Conference Proceeding ISSN. No: 2319-4766 Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies Jan-Feb, 2023 Vol.11/60 BPCA's College of Physical Education, Wadala, Mumbai-31 |
| | Evaluation of Psychological Status of Adolescent Children of Schools of Mumbai (Pg.No.111-115) International Conference on Physical Education, Sports Science & Holistic Approach of Yoga Paper Presentation/ Conference Proceeding ISSN. No: 2319-4766 Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies Jan-Feb, 2023 Vol.11/60 BPCA's College of Physical Education, Wadala, Mumbai-31 |
| | Behavioural Problems of School Students of Greater Mumbai (Pg.No.111-115) International Conference on Physical Education, Sports Science & Holistic Approach of Yoga Paper Presentation/ Conference Proceeding ISSN. No: 2319-4766 Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies Jan-Feb,2023 Vol.11/60 BPCA's College of Physical Education, Wadala, Mumbai-31 |
| | कबड्डी खेळातील समस्या, International Conference on Phy. Edu., Sports Science & Holistic Approach of Yoga Paper Presentation/ Conference Proceeding ISSN. No: 2319-4766 Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies Jan-Feb, 2023 Vol.11/60 BPCA's College of Physical Education, Wadala, Mumbai-31 |
| | Effect of Handball Training Programme on Stress of Students of Thane District International Conference on Phy.Edu., Sports Science & Holistic Approach of Yoga Paper Presentation/ Conference Proceeding ISSN. No: 2319-4766 Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies Jan-Feb, 2023 Vol.11/60 BPCA's College of Physical Education, Wadala, Mumbai-31 |
| | Effect of Integrated Training Programme on Aggression of Junior National Kabaddi Players of Gujarat State International Conference on Physical Education, Sports Science & Holistic Approach of Yoga Paper Presentation/Conference Proceeding ISSN. No: 2319-4766 Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies Jan-Feb, 2023 Vol.11/60 BPCA's College of Physical Education, Wadala, Mumbai-31 |
| | Effect of Yogic Mudras Training Programme on Mental Health (Pg.No. 179-181) International Conference on Physical Education, Sports Science & Holistic Approach of Yoga Conference Proceeding ISSN. No: 2319-4766 Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies Jan-Feb, 2023 Vol.11/60 BPCA's College of Physical Education, Wadala, Mumbai-31 |
| **3** | **Dr.R.N. Shelke,** Comparison Of flexibility of students dwelling in slum area and non slum areas in greater Mumbai, Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies, ISSN 2319- 4766 |
| | A comparative study ofmental health of athletics and non athletics of Mumbai suburban, Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies, ISSN 2319- 4766 |

| | |
|---|---|
| **4** | **Dr.S.N Chougule**, Paper Published with a title "Contribution of IPL to Indian Economy", India and the New World Ordesr: Accelerating with Innovative Development Strategies amidst Global Turbulence" on Zoom Platform organised by Mahatma Night Degree College of Arts and Commerce, Chembur, 19th November, 2022 |
| | Paper Published with a title: Nothing is Impossible in this World! Published in International Journal of Advance & Applied Research (IJAAR). ISSN 2347-7075. Impact Factor 7.328, Voume-9. Issue-3 January-February, 2022 |
| | Paper Published with a title: A Comparative Study Of Physical Fitness Components Of Students Of Ambernath And Ulhasnagar Taluka Of Thane District, Organized by BPCA's College of Physical Education, An International Peer Reviewed, Refereed & Quarterly, Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies, Volume: 11, Issue- 60, Impact Factor SJIF2021=7.380, Online ISSN 2278-8808, ISSN: 2319-4766 (Co-Author) 15th January, 2023 |
| | Paper Published with a title: Comparison Of Body Mass Index, Muscular Strength, Flexibility And Wellbeing Of Schools Students Of Aided And Unaided Of Mumbai, Organized by BPCA's College of Physical Education, An International Peer Reviewed, Refereed & Quarterly,<br>Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies, Volume: 11, Issue- 60, Impact Factor SJIF2021=7.380, Online ISSN 2278-8808, ISSN: 2319-4766 (Principle- Author) 15th January, 2023 |
| | Paper Published with a title: Effectiveness Of Tae-Kwon-Do Training On The Basis Of Speed, Coordination And Aggression Of Students Of Thane District, Organized by BPCA's College of Physical Education, An International Peer Reviewed, Refereed & Quarterly, Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies, Volume: 11, Issue- 60, Impact Factor SJIF2021=7.380, Online ISSN 2278-8808, ISSN: 2319-4766(Co-Author) 15th January, 2023 |
| | Paper Published with a title: Survey Of Body Composition And Somatotype Of Junior National Level Taekwondo athletes, Organized by BPCA's College of Physical Education, An International Peer Reviewed, Refereed & Quarterly, Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies, Volume: 11, Issue- 60, Impact Factor SJIF2021=7.380, Online ISSN 2278-8808, ISSN: 2319-4766 (Co-Author) 15th January, 2023 |
| | Paper Published with a title: The Application Of Yogic Asanas In Prevention Of Sports Injuries, Organized by BPCA's College of Physical Education, An International Peer Reviewed, Refereed & Quarterly, Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies, Volume: 11, Issue- 60, Impact Factor SJIF2021=7.380, Online ISSN 2278-8808, ISSN: 2319-4766(Principle- Author) 15th January, 2023 |
| | Paper Published with a title: Qatar: Stadiums For Global Sport Fifa 2022, National Conference on Physical Education and Sports Sciences, Madhya Bharti, UGC Care Group I Journal, ISSN: 0974-0066 Vol-83 No., 15 January - June 2023 (Co-Author) 5th – 6th April, 2023 |
| **5** | **Mrs.M.A. Samant, Librarian**, Research Paper published in Multidisciplinary Scholarly Research Journal AMIERJ (Aarhat Multidisciplinary International Education Research Journal)<br>Sept.-Oct.-2022 Use of Effective techniques and Outreach programs for Optimum Utilization and Promotion of Library Resources and Services in College Libraries Research Paper |
| | Re-envisioning Library and Information Services in the Agile Era Department of Library & Information Science, University Library, Gujarat University, Ahmedabad & Raja Ram Mohan Roy Library Foundation, Kolkata. 09th & 10th January 2023 The Importance of Soft Skills for Library Professionals for enhancing Utilization of Academic Library Research Paper |
| | Challenges in Implementing National Education Policy (NEP) 2020 Smt. Putlaben Shah College of Education, Sangli. 28th & 29th January, 2023 Role of National Educational Policy 2020 in Academic Libraries in India Research Paper |

| | |
|---|---|
| | Physical Education, Sports Science and Holistic Approach of Yoga B.P.C.A's College of Physical Education, Wadala, Mumbai Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies Jan.-Feb.2023 Implementation of Soft Skill and Core Competencies for Library Professionals with Special Reference to Physical Education Libraries Research Paper |
| **6** | **Dr.K.J.Maru** Effect Of Integrated Training Module on Flexibility of Students with Learning Disability Aged 12 To 16 Years Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies, Page No. 105-107, Vol.-11, Issue- 60, Jan-Feb, 2023 ISSN : 2319 -4766 |
| | A Study of Effect of Holistic Fitness Training Programme on Spiritual Belief And Involvement ofSecondary Schools Male Students of Mumbai Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies, Page No. 116-121, Vol.-11, Issue-60, Jan-Feb, 2023 ISSN: 2319-476 6 |
| | A Study of Effect of Specific Training Programme on Skill Performance of Rope Mallakhamb Players of Mumbai Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies, Page No. 122-126, Vol.-11, Issue-60, Jan-Feb, 2023 ISSN:2319-4766 |
| | A Study of Effect of Judo Training Programme on Scholarly Research Journal for Interdisciplinar ISSN:2319 SJIF2021 = 7.380 01 Superviso R 17.5 Page 10 of 19 |
| | Achievement Motivation of Students of Mumbai City Studies, Page No. 164-168, Vol.-11, Issue-60, Jan-Feb, 2023-4766 |
| | A Comparative Study of Workplace Stress of Physical Education Teachers and Other Subject<br>Teachers of Mumbai City Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies, Page No. 263-265, Vol.-11, Issue-60, Jan-Feb, 2023 ISSN: 2319 -4766 |
| | Professional Kabaddi Players of Maharashtra State B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal, Page No. 37-39, Issue NO-393 (CCCXCIII), January, 2023 ISSN : 2278 -9308 |
| | A Comparative Study of Job Satisfaction of Physical Education Teachers and Other Subject Teachers of Mumbai City International Journal of Science & Engineering Development Research, International Open Access Journal, Page No. 88-89, Volume 8, Issue 2, February-2023, Paper ID - IJSDR2302016 ISSN : 2455 -2631 |

## क. शिक्षकांचे विशेष कार्य

| | |
|---|---|
| 1 | **Dr. R.C. Kawade**, BHARAT RATNA DR.ABDUL KALAM GOLD MEDAL AWARD", for individual achievement and national development. Dt.24th July 2022. |
| | Selection of Mumbai City Handball (Men and Women) Committee |
| | Inter Zone Handball Competition Mumbai City team (Men & Women) role of Coach and Team Manager |
| 2 | **Dr. N.O.Joshi,** Distinguished Scientist Award, dt.28.03.23, National, Sports Psychology Association of India & Dept. of Phy. Edu. & Sports, Dr.Ambedkar College, Nagpur |
| 3 | **Dr.S.N Chougule,** Maharashtra Rajya Bharat Scout and Guide, at Sane Guruji Rashtriya Smarak, Mangaon organized by B.P.C.A's College of Physical Education 10th -16th September, 2022 |
| | Official for Interschool's Drawing Competition organized by Dadasaheb Gaikwad school, Sion, 13th November, 2022 |

४. **श्रध्दांजली:-**

अहवालसाली मंडळाशी संबंधित तसेच देशभरातील ज्या नामवंत व थोर व्यक्तींचे निधन झाले, त्या सर्वांना मंडळाच्यावतीने भावपूर्ण श्रध्दांजली. त्यात प्रामुख्याने पंडीत शीवकुमार शर्मा, महान संतुरवादक(दि.१० मे, २०२२), नामांकित गायक भुपेंद्र सिंग(दि.१९ जुलै, २०२२), भारतीय अब्जाधिशाचे जनक व शापुरजी पालोनजी ग्रुपचे चेअरमन पालोनाजी मिस्त्री(दि.२७ जून, २०२२), मराठी सिनेअभिनेता श्री.प्रदीप पटवर्धन (दि. ९ ऑगष्ट, २०२२), हिंदी कॉमेडी स्टार श्री.राजू श्रीवास्तव(दि.२१ सप्टेंबर, २०२२), ज्येष्ठ राजकारणी आणि समाजवादी पक्षाचे संस्थापक श्री.मुलायम सिंग यादव(दि.१० ऑक्टोबर, २०२२), टाटा स्टीलचे माजी एमडी श्री.जमशेद जे इराणी (दि.३१ ऑक्टोबर, २०२२), भारतीय सिनेमाचे अभिनेता आणि फिल्ममेकर श्री.सतीशचंद्र कौशिक (दि.९ मार्च, २०२३), लेखक दिग्दर्शक प्रदिप सरकार (दि.२४ मार्च, २०२३), क्रिकेटपटू सलिम दुराणी (दि.२ एप्रिल, २०२३), प्रसिध्द अभिनेत्री उत्तरा बावकर (दि.१२ एप्रिल, २०२३), प्रसिध्द इतिहासकार रणजीत गुहा (दि.२८ एप्रिल, २०२३), वृत्तपत्र छायाचित्रकार प्रशांत नाडकर (दि.५ मे, २०२३), माजी महापौर विश्वनाथ महाडेश्वर(दि.८मे, २०२३), ज्येष्ठ शिक्षणतज्ञ माजी कुलगुरू डॉ.राम ताकवले(दि.१३ मे, २०२३), जेष्ठ समाजवादी नेते, पत्रकार रविंद्र वैद्य(दि.२६ मे, २०२३), ख्यातनाम समिक्षक व संत साहित्याचे अभ्यासक डॉ.किशोर सानप (दि.२७ मे, २०२३),

सर्व महान व्यक्तींच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्यावतीने परमेश्वर चरणी प्रार्थना!!

५. **आभार**

कोरोना महामारीमुळे उद्‌भवलेल्या अतिशय प्रतिकुल प्ररिस्थितीत अनेक व्यक्ती आणि संस्था यानी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे संस्थेस आधार दिला. महाराष्ट्र राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तसेच राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रूसा) आणि विद्यापीठ अनुदान आयोगाकडून महाविद्यालय व संस्थेला अनुदानरूपाने आर्थिक सहकार्य मिळाले. मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचा उत्कर्ष आपणा सर्वांच्या विश्वासावर व आधारावर अवलंबून आहे, याची जाणीव मंडळाला सदैव आहे. बलशाली भारताचे स्वप्न उराशी बाळगून कार्य कारणा-या आणि अमृत महोत्सवी वर्षाकडून शताब्दी वर्षाकडे वाटचाल करीत असलेल्या आमच्या मुंबई शारीरिक शिक्षण मंडळास आपण भविष्यातही सहकार्य करावे ही नम्र विनंती.

आपला नम्र,

दिपक बाबूराव शेटे
जनरल सेक्रेटरी,
मुंबई शारीरिक शिक्षण
मंडळ

# -: वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना :-

स.न.वि.वि.

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाची ८८ व्या वर्षातील वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२१ ऑक्टोबर, २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वा. भारतीय क्रीडा मंदिर, पहिला मजला सभागृह, वडाळा, मुंबई- ३१ येथे घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

सभेपुढील विषय:-

१. मागील दि.९ ऑक्टोंबर २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सभेचा इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.
२. मागील वर्षाचा [सन २०२१-२०२२ ] वार्षिक अहवाल मंजूर करणे.
३. मागील वर्षाचे [सन २०२१-२०२२ ] वार्षिक जमाखर्च व ताळेबंद तक्ता वाचून मंजूर करणे.
४. सन २०२२-२०२३ सालासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
५. सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक वाचून मंजूर करणे.
६. कार्यकारी समितीच्या संमतीने आलेल्या सूचनांचा विचार करणे व अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळेस येणारे इतर विषय.

सूचना:-

१. गणसंख्येच्या अभावी सदर सभा तहकुब झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी तहकुब केलेल्या वेळेपासून ३० मिनिटांनंतर सुरू होईल. अशाप्रकारे तहकुब होवून सुरू झालेल्या सभेस गणसंख्येची आवश्यकता रहाणार नाही.

२. ज्या सभासदांना सर्वसाधारण सभेपुढे सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी सभेपुर्वी पाच दिवस अगोदर सूचक अनुमोदकाच्या सहीनिशी मंडळाच्या कचेरीत लेखी पाठविण्याची कृपा करावी. त्यानंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.

३. सर्व सभासदांना ८७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस पाठविली आहे. ८७ वा वार्षिक अहवाल संस्थेच्या कार्यालयातून कामकाजाच्या वेळेत घेण्यात यावा.

दिनांक:

आपला नम्र,

[श्री.दिपक बाबुराव शेटे]
प्रमुख कार्यवाह

स्थळः कचेरी, भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव–वडाळा क्रॉस रोड, वडाळा, मुंबई–400031